विषयः- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोयजना करणे बाबत
(कोविड-१९, उपचार केंद्र अनुषंगीक कामे पार पाडण्यासाठी नोडल अधिकारी यांच्या नियुक्त्या)

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१ /कोरोना/सीआर-
दि. ७ /५/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.
४) या कार्यालयाचे समक्रमांकित Containment Zone च्या नियोजनबाबतचे आदेश, दिनांक ०५.०५.२०२०

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे. त्यानुसार मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी मला ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी, कोविड-१९, विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी स्थापन करण्यात आलेले उपचार केंद्र व तदअनुषंगीक कामासाठी समन्वय अधिकारी (Nodal Officer ) यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील अधिका-यांची याव्दारे नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | समन्वय अधिका-याचे नांव व पदनाम | सोपविलेली जबाबदारी |
|---|---|---|
| १ | श्री.शरद कुलकर्णी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | रुग्णांचे स्थलांतर व CCC केंद्रातील ऑक्युपन्सी |
| २ | श्री.खुशालसिंह परदेशी,<br>अपर जिल्हाधिकारी, नांदेड | कंटेन्मेंट झोनचे पर्यवेक्षण करणे. |
| ३ | डॉ.सचिन खल्लाळ,<br>निवासी उपजिल्हाधिकारी, नांदेड | कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांसाठी क्वारंटाईन सुविधा उपलब्ध करुन देणे. |
| ४ | श्री.लतीफ पठाण,<br>उपविभागीय दंडाधिकारी तथा इंन्सिडंन्ट कंमाडर नांदेड | जाहीर करण्यात आलेल्या Containment Zone मध्ये या रोगाचा प्रसार रोखण्याासंबंधाने वेळोवेळी जाहीर करण्यात आलेले निर्देश व आरोग्य विभागाने जाहीर केलेली प्रमाणित कार्यपध्दती (SOP) नुसार या कार्यालयाचे संदर्भीय आदेश क्र.०४ नुसार जबाबदारी पार पाडावी. |
| ५ | श्री.प्रशांत शेळके,<br>उप जिल्हा निवडणूक अधिकारी, नांदेड | १) वैद्यकीय उपकरणे व साहित्य अनुषंगिक कामे<br>२) कोरोना उपचार केंद्रासाठी इमारती निश्चीत करणे. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री.शरद मंडलीक,<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड | कंटेन्मेंट झोनमध्ये अन्नधान्य पुरवठा करणे |
| ७ | डॉ.निळकंठ भोसीकर,<br>जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड | कोविड-१९ केंद्रासाठी आवश्यक मनुष्यबळ व्यवस्थापन उपलब्ध करुन देणे. |
| ८ | डॉ. बालाजी शिंदे,<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड | कोविड-१९ विषाणूंचा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णांचे Contact Tracing |
| ९ | श्री.शुभम क्यातमवार,<br>उपायुक्त (महसूल), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | निर्जतुकीकरण ( Sanitization) करणे |
| १० | श्री.विलास भोसीकर,<br>उपायुक्त (विकास), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | विलगीकरण केंद्रासाठी अन्नधान्य पुरवठा करणे |
| ११ | डॉ.सुरेशसिंग बिसेन,<br>मुख्य वैद्यकीय अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | स्वॅबचे नमुने घेवून चाचणीसाठी पाठविणे व इतर अनुषंगिक तपासणीचे कामे |

सदर आदेशाची अंमलबजावणी करताना अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास संबंधीतांनी अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती आपले स्तरावरुन करावी. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ प्रभावाने अंमलात आणावी.

आणि असेही आदेशित करीत आहे की, जे कोणी व्यक्ती, समुह सदर आदेशाचे उल्लंघन करील, त्यांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये व भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**
मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद
**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**
१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३. पोलीस अधीक्षक, नांदेड
४. जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
७. सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा यांना अनूपालनास्तव
८. सबंधित तहसिलदार जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड यांना अनुपालनास्तव.
९ सर्व संबंधीत अधिकारी यांना अनुपालनार्थ देण्यात येते.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned with CamScanner